# महाराष्ट्र विधानपरिषद

# दिवसाच्या कामकाजाचा क्रम

## सोमवार, दिनांक १४ मार्च, २०२२

## (सकाळी १०-०० ते ११-४५ वाजेपर्यंत)

**(मंगळवार, दिनांक ८ मार्च, २०२२, बुधवार, दिनांक ९ मार्च, २०२२ व गुरुवार, दिनांक १० मार्च, २०२२ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव) — (चर्चा पुढे सुरु व मंत्र्यांचे उत्तर) —**

**सर्वश्री प्रविण दरेकर,** विजय ऊर्फ भाई गिरकर, प्रसाद लाड, चंद्रशेखर बावनकुळे, सुरेश धस, डॉ.परिणय फुके, सर्वश्री सदाशिव खोत, विनायक मेटे, डॉ.रणजित पाटील सर्वश्री प्रविण पोटे पाटील, महादेव जानकर, रणजितसिंह मोहिते-पाटील, ॲड.निरंजन डावखरे, सर्वश्री निलय नाईक, चंदुभाई पटेल, गोपिचंद पडळकर, रमेशदादा पाटील, रामराव पाटील, प्रविण दटके, रामदास आंबटकर, रमेश कराड, अमरीशभाई पटेल, **वि.प.स. यांचा म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव —**

"१९९३ चा बॉम्बस्फोट व २००८ मधील मुंबईवर झालेल्या दहशतवादी हल्ल्याचे आघात अद्यापही विसरले नसताना दिवसाढवळया खून, बलात्कार, चोऱ्या, दरोड्यामुळे सर्वसामान्य जनता त्रस्त असताना त्यावर कोणताही मार्ग न काढता भ्रष्टाचाऱ्यांना संरक्षण दिल्यामुळे राज्यातील कोट्यवधी जनतेचा कायदा व सुव्यवस्थेवरील उडालेला विश्वास, महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांचे जन्मदिनी ५०० नागरिकांपेक्षा अधिकची गर्दी जमवल्यामुळे हजारो शिवभक्तांवर दाखल झालेले गुन्हे व त्याचवेळेस सत्ताधारी पक्षाच्या प्रवक्त्यांच्या पत्रकार परिषदेत १५०० नागरीक उपस्थित असताना एकाही व्यक्तीवर दाखल न झालेले गुन्हे, कायद्याचा वापर स्वतःच्या सोयीने केल्याने कोट्यवधी शिवभक्तांमध्ये पसरलेला असंतोष, लोकप्रतिनिधींना गुंडांकडून मिळत असलेल्या धमक्या, राजकीय हस्तक्षेपामुळे बड्या राजकीय नेत्यांविरोधातील गुन्ह्यांच्या तपासात आलेली शिथिलता, हत्या, अपहरण, दरोडे, घरफोड्या यासारख्या गुन्ह्यांना आळा घालण्यात आलेले अपयश, मुंबई, नवी मुंबईसह राज्यातील मोठ्या शहरातील गुन्ह्यात झालेली वाढ, सायबर हल्ल्यांना व गुन्ह्यांना रोखण्यात आलेले अपयश, अंमली पदार्थ, गुटखा व्यापार, जुगार, मटका या अवैध धंद्यात झालेली अपरिमित वाढ, अल्पवयीन मुले, मुली व महिलांवरील अत्याचाराच्या घटनांमध्ये झालेली वाढ, मृत पूजा चव्हाण आत्महत्या प्रकरणाच्या तपासातील संथगती, डान्सबार, पब,

अप्रकाशित

डिस्कोथेक, ऑनलाईन गेमिंग, विशेषत: ऑनलाईन लॉटरीमधील भ्रष्टाचाराला आळा घालण्यात आलेले अपयश, त्यांच्या चालकांना मिळणारे अभय, पोलिसांवर पडणारा ताण व पोलिसांच्या मागण्यांकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, मागासवर्गीय समाजावर होणारे हल्ले व त्यांच्यात वाढलेली असुरक्षिततेची भावना, राजकीय कार्यकर्ते, लोकप्रतिनिधींवर होणारी सुडबुध्दीने कारवाई, राज्याची कायदा व सुव्यवस्था कोलमडल्यामुळे गोरगरीब जनता, महिला व सर्वसामान्यांमध्ये निर्माण झालेले असुरक्षिततेचे व चिडीचे वातावरण, तसेच, एसटी कर्मचाऱ्यांच्या संपाला शंभर दिवसांपेक्षा जास्त कालावधी होऊन देखील संप मिटवण्यात सरकारला आलेले अपयश, शेकडो कर्मचाऱ्यांनी केलेल्या आत्महत्या, मा.न्यायालयाने सरकारवर ओढलेले ताशेरे, संपामुळे राज्यातील ग्रामीण शहरी भागातील प्रवाशांना होत असलेला अतोनात त्रास, एसटी कर्मचारी व कुटुंबीयांमध्ये निर्माण झालेले निराशेचे वातावरण, तसेच, सरकारच्या बेपर्वा धोरणामुळे मराठा व ओबीसी आरक्षण रद्द होणे, इतर मागासवर्ग आयोगाचा अंतरिम अहवाल मा.सर्वोच्च न्यायालयाने फेटाळला असणे, अहवाल फेटाळत असताना न्यायालयाने सांख्यिकी अभ्यास आणि संशोधनाविनाच अंतरिम अहवाल तयार केला असल्याचे, अहवालात इतर मागासवर्गीयांच्या राजकीय प्रतिनिधित्वाबाबत कोणतीही माहिती नसल्याचे, स्थानिक स्वराज्य संस्थानिहाय ओबीसी प्रतिनिधित्वाची माहिती नसल्याचे तसेच कोणत्या कालावधीतील माहितीच्या आधारे हा अहवाल तयार केला याबाबतही स्पष्टता नसल्याचे न्यायालयाने नमूद केले असणे, तसेच, ओबीसी आरक्षणाशिवाय निवडणूका घेण्याचे आदेश निवडणूक आयोगाला व राज्य सरकारला दिलेले असणे, सरकारच्या अनास्थेमुळे ओबीसी आरक्षण गमावण्याची आलेली वेळ, सुरुवातीपासूनच सरकारी उदासीनतेमुळे मागासवर्ग आयोग स्थापन करण्यात व आयोगाला कर्मचारी व निधी देण्यात सरकारकडून होणारी टाळाटाळ, मराठा व ओबीसी समाजासाठी केलेल्या घोषणांची दोन वर्षात न झालेली अंमलबजावणी, यामुळे या दोन्ही समाजात शासनाबद्दल निर्माण झालेली तीव्र उद्रेकाची भावना, धनगर आरक्षणाच्या प्रश्नाबाबत सरकारकडून कोणतीही कार्यवाही न होणे, संविधानानुसार धर्माच्या आधारे आरक्षण देता येत नसताना, मंत्रिमंडळाचा निर्णय झालेला नसताना मंत्र्यांनी आरक्षण देण्याबाबत सभागृहात केलेली घोषणा व परिणामी नागरिकात निर्माण झालेली संदिग्धतेची भावना, तसेच टीईटी व अन्य स्पर्धा परीक्षेत झालेले घोटाळे, स्पर्धा परीक्षेसाठी सेवा पुरवठादार कंपन्यांची निवड करताना झालेल्या अनियमितता, परिणामी राज्यातील लाखो उमेदवारांची नोकरीची संधी हिरावल्यामुळे त्यांच्यात निर्माण झालेला असंतोष, याबाबत शासनाने करावयाची उपाययोजना विचारात घेण्यात यावी."

**(दुपारी १२-०० वाजता)**

**एक : प्रश्नोत्तरे.**

**दोन : कागदपत्रे सभागृहाच्या पटलावर ठेवणे —**

**जलसंपदा मंत्री** : **(क)** "विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर यांचे सन २०१५-२०१६, सन २०१६-२०१७ व सन २०१८-२०१९ या वर्षांचे अनुक्रमे एकोणवीसावा, वीसावा व बावीसावा वार्षिक वित्तीय अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**(ख)** "तापी पाटबंधारे विकास महामंडळ, जळगाव यांचा सन २०१९-२०२० या वर्षाचा बावीसावा वार्षिक वित्तीय अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**तीन : (क) म.वि.प. नियम ९३ अन्वये सूचना — (असल्यास).**

**(ख) म.वि.प. नियम ९३ अन्वये सूचनेचे निवेदन —**

**ॲड.निरंजन डावखरे, वि.प.स.** यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील **सूचना क्रमांक २** वर **शालेय शिक्षण मंत्री** निवेदन करतील:-

"राज्यात शाळेतील विद्यार्थ्यांकडे आधारकार्ड नसलेल्यांची नावे शाळेच्या पटावरुन कमी करण्याची सूचना शिक्षण विभागाने दिलेली असल्याचे निदर्शनास येणे, त्यामुळे पालकांत निर्माण झालेला असंतोष."

**चार : लक्षवेधी सूचना — (म.वि.प. नियम १०१ अन्वये) —**

(१) **श्री.संजय दौंड, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **ग्रामविकास मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"प्रधानमंत्री ग्राम सडक योजनेतून सन २०१७-२०१८ व सन २०१८-२०१९ मध्ये रा.मा.क्र.२३३ ते नंदनज तसेच इजिमा १०२ ते अस्वलंबा तांडा रोड तसेच प्र.जि.मा.५२ ते बहादूरवाडी प्र.जि.मा.५३ ते डाबी तांडा, रा.मा.क्र.२२१ ते बेलंबा तांडा रोड, रा.मा.क्र.२३५ ते लेंडेवाडी प्र.जि.मा. ५३ ते इंदपवाडी तांडा

रोड, रा.मा.क्र. २३५ ते जिगानाईक तांडा, इ.जि.मा.१४१ ते कोलदरी तांडा, रा.मा.क्र.५५ ते खारी तांडा सर्व तालुका परळी, जि.बीड अशी एकूण ११ कामे मंजूर करण्यात आलेली असणे, सदर कामांचा प्रमुख उद्देश वर नमूद सर्व गावे ही बारमाही रस्त्याने जोडणे हा असणे, सदर कामांच्या निविदा प्रक्रिया पूर्ण होऊन संबंधितांना दिनांक ७/९/२०१८ रोजी कार्यारंभ आदेश दिलेला असणे, तथापि सदर कामे अद्यापही पूर्ण झालेली नसणे, तसेच झालेल्या कामांचा दर्जा अत्यंत असमाधानकारक असल्याचे अहवालात नमूद करण्यात आलेले असणे, अद्याप काही कामे सुरु देखील केलेली नसून कार्यारंभ आदेश देऊन सुमारे ३ ते ४ वर्षांचा कालावधी उलटूनही संबंधितांनी कामे पूर्ण केलेली नसणे, सदर बाबींमुळे सार्वजनिक निधीचा अपव्यय झालेला असून योजनेच्या मूळ हितास हरताळ फासला गेलेला असणे, परिणामी जनतेमध्ये शासनाविरोधात तीव्र असंतोष निर्माण झालेला असणे, शासनाने सदर प्रकरणाची तातडीने चौकशी करुन कार्यवाही करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली व करावयाची कार्यवाही व शासनाची भूमिका."

(२) **श्री.कपिल पाटील**, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **शालेय शिक्षण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"राज्यातील प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालयातील गुणवत्तेचा दर्जा कमी होत जाणे, असूनही साडेतीन लाखाहून अधिक मुले शाळा बाहय असणे, संचमान्यतेचे निकष बदलून गणित, विज्ञान, इंग्रजी, हिंदी-उर्दू, मराठी, समाजशास्त्र विषयांना स्वतंत्र शिक्षक मिळण्याची आवश्यकता असणे, कला-क्रीडा शिक्षकांची पदे पुनर्स्थापित करण्याची आवश्यकता असणे, दुर्गम व मागास भागातील कमी पटसंख्येच्या शाळांना संरक्षण देण्याची आवश्यकता असणे, कार्यानुभव विषयांतर्गत संगणक साक्षरतेचे महत्व लक्षात घेऊन प्रत्येक शाळेत ICT शिक्षक पद निर्माण करण्याची आवश्यकता असणे, शाळेतील अर्धवेळ ग्रंथपाल पदांवरील कार्यरत कर्मचाऱ्यांना विषयभार देऊन पूर्णवेळ शिक्षक (ग्रंथपाल) किंवा मोठ्या शाळांमध्ये पूर्णवेळ शिक्षक (ग्रंथपाल) पदाचा संचमान्यतेत समावेश करण्याची आवश्यकता असणे, अशैक्षणिक कामांसाठी अधिग्रहित करण्यात आलेल्या शिक्षक/शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना रिक्त पदांवर पाठवण्याची आवश्यकता असणे, अनुकंपा तत्वावरील भरती तात्काळ सुरु करण्याची आवश्यकता असणे, विनाअनुदानित शाळा व तुकडयांची त्रुटी पूर्तता करून १०० टक्के वेतन सुरू करणे, चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांची कंत्राटी पद्धतीने सुरु केलेली नेमणूक रद्द करून कायम स्वरूपी वेतनश्रेणीवर नियुक्ती करण्याची आवश्यकता असणे, या प्रश्नांच्याबाबत तातडीने सोडवणूक न झालेल्या

शिक्षक/शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांमध्ये निर्माण झालेला असंतोष, याबाबत तातडीने दखल घेऊन शासनाने करावयाची उपाययोजना व कार्यवाही."

(३) **श्री.अरुण लाड, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **पशुसंवर्धन मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"सांगली तालुक्यातील पलूस तालुका हा संपूर्ण बागायती क्षेत्र असणारा तालुका असणे, तालुक्यातील ३४ गावांत तब्बल ५३ हजार पशुधन असून त्यात गाई,म्हशी,शेळी-मेंढी व इतर पशुधनाचा समावेश असणे, तसेच शेतीबरोबरच पशुपालनाचा व्यवसाय देखील मोठया प्रमाणात तालुक्यात करण्यात येत असणे, तालुक्यात ५३ हजार इतके पशुधन असताना उपचार करण्यासाठी तालुक्यात केवळ ७ पशुवैद्यकीय दवाखाने असून त्यासाठी नियुक्त करण्यात आलेले पशुधन विकास अधिकारी, सहाय्यक पशुवैद्यकीय अधिकारी यांचे एकेक पद तर पर्यवेक्षक ३, ड्रेसर ३ व परिचारक चार यापैकी पाच पदे रिक्त असणे, त्यामुळे पशुधनाचे उपचारांवर परिणाम होऊन उपचाराअभावी जनावरे दगावण्याची शक्यता नाकारता न येणे, त्यामुळे पशुधनाच्या तुलनेत पशुवैद्यकीय दवाखाने तसेच पशुवैद्यकीय अधिकारी व कर्मचारी यांची रिक्त असलेली पदे तातडीने भरण्याची तालुकावासियांकडून होत असलेली आग्रही मागणी, तथापि, वारंवार मागणी करुनही अद्याप दवाखान्यांची संख्या वाढविणे व रिक्त पदे भरण्याबाबत कार्यवाही न झाल्यामुळे तेथील जनतेमध्ये निर्माण झालेले असंतोषाचे वातावरण व नाराजीची भावना, त्याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व शासनाची भूमिका."

(४) **सर्वश्री विजय ऊर्फ भाई गिरकर,** प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.रमेशदादा पाटील, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **क्रीडा मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"मल्लखांब हा खेळ अस्सल पारंपारिक देशी खेळ असून महाराष्ट्राच्या लाल मातीत जन्मलेला हा अस्सल मराठमोळा खेळ आज भारतातील जवळजवळ सर्व राज्यात खेळला जात असणे, भारताच्या सीमा ओलांडून जगातील पाच पैकी ४ खंडात सुमारे ३५ देशात आता मल्लखांब पोहचला असणे, सन २०१९ साली मुंबईच्या शिवाजी पार्क येथे मल्लखांबाची पहिली विश्वचषक स्पर्धा पार पडणे त्यात भारत हा विश्वविजेता ठरला असल्याची बाब निदर्शनास येणे, सदर स्पर्धेमध्ये भारताचे प्रतिनिधित्व करणारा मुंबईचा खेळाडू कु.दिपक शिंदे हा विश्वविजेता (world Champion) ठरणे, त्याने इतर प्रकारात दोन सुवर्ण व तीन रौप्य पदक पटकावले असणे, केंद्र सरकारनेही मध्य प्रदेशचे मल्लखांब प्रशिक्षक श्री.योगेश मालवीय यांना ‘द्रोणाचार्य

अग्रिम प्रत

पुरस्कार' तसेच पहिल्या विश्वचषक स्पर्धेत भारताचे प्रतिनिधित्व करणारी विश्वविजेती मुंबईची खेळाडू कु.हिमानी परब हिला 'अर्जुन पुरस्काराने' सन्मानित करून मल्लखांब या खेळाला आंतरराष्ट्रीय दर्जा प्राप्त करून दिला असणे, मल्लखांब खेळातील खेळाडूंनी केलेल्या उल्लेखनीय कामगिरीची दाखल घेऊन केंद्र सरकारने मल्लखांब हा खेळ राज्यातील थेट भरतीसाठीच्या खेळांमध्ये समावेश करण्यासाठी सर्व राज्यांना आदेश निर्गमित करणे, याची दखल घेत जवळजवळ देशातील सर्व राज्यांनी याची अंमलबजावणी केली असल्याची बाब निदर्शनास येणे, परंतु महाराष्ट्र राज्याने केंद्र सरकारच्या आदेशाची अद्यापपर्यंत अंमलबजावणी केली नसल्याची धक्कादायक बाब समोर येणे, परिणामी विश्वविजेत्या ठरलेल्या कु.दिपक शिंदे व कु.हेमानी परब यांसारखे खेळाडू हक्काच्या रोजगारापासून वंचित राहत असणे, राज्य शासनाच्या या ढिसाळ कारभारामुळे अनेक होतकरू खेळाडू परावृत्त होऊन खेळाडूंमध्ये शासनाप्रती पसरलेला तीव्र असंतोष, मल्लखांब या खेळात राज्यातील प्राविण्य प्राप्त खेळाडूंना शासन सेवेत थेट नियुक्ती देऊन प्रोत्साहित करण्याची नितांत आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची भूमिका."

(५) **श्री.नरेंद्र दराडे**, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **मदत व पुनर्वसन मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"उत्तर महाराष्ट्रात दिनांक ८ व ९ मार्च, २०२२ रोजी झालेल्या अवकाळी पाऊस व गारपीटमुळे नाशिक, जळगांव व नंदूरबार या जिल्ह्यांमध्ये द्राक्ष, कांदा, हरभरा, मका आणि गहू या पिकांचे फार मोठ्या प्रमाणात झालेले नुकसान, शेतकऱ्यांच्या हाता-तोंडाशी आलेल्या या पिकांचा नाश झाल्याने शेतकरी वर्गात पसरलेले चिंतेचे, असुरक्षिततेचे व असंतोषाचे वातावरण, तसेच नाशिक जिल्ह्यातील चांदवड तालुक्यातील वाकी बुद्रुक येथील श्री.कैलास सुर्यभान कवडे या एका शेतकऱ्याचा वीज पडून दिनांक ९ मार्च, २०२२ रोजी झालेला मृत्यू, शासनाने अवकाळी पावसामुळे पिकांच्या झालेल्या नुकसानीचे तातडीने पंचनामे करुन नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना आर्थिक मदत जाहिर करण्याची तसेच वीज पडून मृत्यू झालेल्या तरुणाच्या कुटुंबियांना नैसर्गिक आपत्तीच्या अनुषंगाने आर्थिक मदत देण्याबाबत शासनाने तातडीने निर्णयात्मक कार्यवाही करण्याची आवश्यकता व शासनाची भूमिका."

(६) **डॉ.सुधीर तांबे,** सर्वश्री जयंत आसगावकर, अभिजित वंजारी, डॉ. वजाहत मिर्झा, सर्वश्री राजेश राठोड, अमरनाथ राजूरकर, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.मोहनराव कदम, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **आदिवासी विकास मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"राज्यातील आदिवासी विभागाच्या अनुदानातील आश्रमशाळांना गेल्या दोन वर्षांपासून शासनाच्या आदिवासी व वित्त विभागांकडून विद्यार्थ्यांच्या भोजनापोटी देय परिरक्षण मिळण्यास वारंवार होणारी दिरंगाई व अडवणूक, यामुळे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक व इतर सोयी सवलतीवर होणारे परिणाम, त्यामुळे शासनाबाबत निर्माण झालेला असंतोष, नाशिक संच अप्पर आयुक्त क्षेत्रातील आश्रमशाळांचे गेल्या दोन वर्षांपासून परिरक्षण अनुदान निर्धारण करण्यास झालेली दिरंगाई, त्यामुळे परिपोषण अनुदान मिळण्यास येणाऱ्या अडचणी व त्यावर करावयाची उपाययोजना, आश्रमशाळा संहितेप्रमाणे मान्यतेबाबत शासनाने निर्णय न घेणे, आदिवासी आश्रमशाळांच्या उच्च माध्यमिक आश्रमशाळेत गणित/भौतिकशास्त्र या विषयासाठीच्या एका पदास मंत्रीमंडळाच्या मान्यतेचे शासनाचे आदेश निघालेले असताना ते पद भरण्यास मान्यता न दिल्याने आदिवासी विद्यार्थ्यांना फक्त एकाच म्हणजे मेडिकल किंवा इंजिनियरींगला जाता येत असल्यामुळे विद्यार्थ्यांचे होणारे नुकसान, महागाईच्या काळात पहारेकरी पदास २४ तासासाठी फक्त दरमहा फक्त ५००० हे तुटपुंजे मानधन मिळत असल्यामुळे कोणीही व्यक्ती या पदावर काम करण्यास तयार नसणे, मानधन वाढविण्याबाबत आदिवासी विभागाने कोणताही निर्णय न घेणे, कोरोना काळात आश्रमशाळांमधील मृत्यूमुखी पडलेल्या शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांच्या रिक्त जागावर व सेवानिवृत्तीमुळे शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांची रिक्त झालेली पदे न भरल्यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत असणे, ही पदे तात्काळ भरण्यास मान्यता देण्याबाबत निर्णय अपेक्षित असणे, आश्रमशाळांतील लहान मुलांसाठी सफाईदाराचे पद नसल्यामुळे मुलांच्या आरोग्यावर होणारे परिणाम लक्षात घेता मानधन तत्वावर महिला व पुरुष सफाईदार पदास तात्काळ मान्यता मिळण्याची आवश्यकता, विद्यार्थ्यांची संख्या लक्षात घेता व आरोग्याच्या दृष्टीने सहाय्यक अधिक्षक व सहायक अधिक्षिका हे पद भरतीस प्राधान्याने मान्यता मिळण्याची आवश्यकता इ. अनेक मागण्यांवर वारंवार शासनाकडे निवेदने दिली असता त्याकडे शासनाचे होणारे अक्षम्य दुर्लक्ष, यावर शासनाने करावयाची उपाययोजना व करावयाची कार्यवाही."

**पाच : म.वि.प. नियम १०१ — अ अन्वये विशेष उल्लेख — (असल्यास).**

# - मध्यंतर -

**सहा : उप मुख्यमंत्री तथा वित्त मंत्र्यांचा प्रस्ताव :-**

"महाराष्ट्र विधानपरिषद नियमांतील नियम २८९ अन्वये अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चेच्या संदर्भात विधानपरिषद नियमांतील नियम २२८ (१) मधील सात दिवसांच्या कालावधीबाबतची जी तरतूद आहे, ती स्थगित करण्यात यावी."

**सात : सन २०२२-२०२३ च्या अर्थसंकल्पावर सर्वसाधारण चर्चा (पहिला दिवस).**

**आठ : शासकीय विधेयक —**

**विधानसभेने कोणत्याही सुधारणांशिवाय पुन्हा संमत केलेल्या विधेयकावर फेरविचार पुढे सुरु व संमत करणे.**

"भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २०० अन्वये राज्यपालांच्या अधिसंमतीसाठी पाठविलेले व राज्यपालांनी फेरविचारार्थ पाठविलेले सन २०२१ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३९- महाराष्ट्र सहकारी संस्था (तिसरी सुधारणा) विधेयक, २०२१"

**नऊ : अर्धा-तास चर्चा — म.वि.प. नियम ९२ अन्वये (बैठकीच्या शेवटी) —**

(१) **(सोमवार, दिनांक ०७ मार्च, २०२२ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेली परंतु प्रलंबित असलेली अर्धा-तास चर्चेची सूचना) [अनुक्रमांक (१)] —**

**सर्वश्री चंद्रशेखर बावनकुळे,** रामदास आंबटकर, प्रवीण दटके, **वि.प.स.** पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.

"नागपूर जिल्ह्यात प्रधानमंत्री खनिज क्षेत्र कल्याण योजनेन्वये १३ तालुक्यातील लाभार्थ्यांकरीता रोजगार निर्मिती कार्यक्रमांतर्गत दुग्धविकास व शेळीपालन गट वाटप योजनेस जिल्हा खनिज प्रतिष्ठान अंतर्गत मान्यता प्राप्त केलेली असणे, सदर योजनेंतर्गत रुपये १०.४५ कोटी निधी देण्यात आलेला असणे, जिल्हयातील सर्व तालुक्याला समान तत्वावर योजनेचा लाभ न देता आर्थिकदृष्टया प्रबळ व्यक्तीची लाभार्थी म्हणून निवड करण्यात येणे, त्यामुळे गरजू व्यक्तींची नावे यादी मध्ये समाविष्ट करण्यात आलेली नसणे, प्रत्येक तालुक्यासाठी समान वाटपाचे धोरणान्वये लाभार्थी निवडण्याबाबत तसेच नव्याने यादी तयार करण्याबाबत जिल्हा परिषद सदस्यांनी मागणी केलेली असणे, रोजगार निर्मितीचा लाभ गरजू लाभार्थ्यांना देण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

अप्रकाशित प्रत

**(शुक्रवार, दिनांक ११ मार्च, २०२२ रोजी बॅलटद्वारे काढण्यात आलेल्या अर्धा-तास चर्चेच्या सूचना) [अनुक्रमांक (२) व (३)] —**

**(२)** **सर्वश्री चंद्रशेखर बावनकुळे,** रामदास आंबटकर, प्रवीण दटके, **वि.प.स.** पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.

"राज्यात मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेंतर्गत १०० लोकसंख्येची गावे मुख्य रस्त्याला जोडण्यासाठी ग्रामसडक योजनेचा पहिला टप्पा सन २०१५ ते २०१९ पर्यंत राबविला असणे, नागपूर जिल्हयातील ८२४ कि.मी. रस्ते बांधकामाला मंजूरी मिळाली असून ६३७ कि.मी. ची रस्त्याची कामे पूर्ण होवून १८४ कि.मी. रस्त्याची कामे निधी अभावी पूर्ण झालेली नसणे, ग्रामसडक योजनेच्या दुसरा टप्प्याला मंजूरी प्राप्त असतानाही शासनाकडून निधीबाबत कोणतीही तरतूद केलेली नसणे, सन २०१९-२०२० मध्ये अनेक रस्त्याची कामे कंत्राटदाराने सुरू केलेली असून निधी प्राप्त न झाल्याने रस्त्त्यांची कामे अपूर्ण अवस्थेत असणे, येरणगाव ते खापा निपानी येथे ९ कि.मी. डांबरी रस्त्याचे काम दिनांक ०२/०६/२०२० रोजी पूर्ण होणे आवश्यक असतानाही अद्यापही अपूर्ण असणे, मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेंतर्गत केलेल्या रस्त्यांच्या अनेक कामांबाबत तक्रारी प्राप्त होत असूनही बांधकाम विभागामार्फत कोणतीही कार्यवाही करण्यात येत नसणे, ग्रामीण भागाच्या दृष्टीने महत्वाच्या असलेल्या मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेच्या कामांना निधी मिळण्याबाबत तसेच रस्त्यांचे काम निकृष्ट दर्जाचे करणाऱ्या कंत्राटदारांवर कारवाई करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(३)** **सर्वश्री सुनिल शिंदे,** श्री.विलास पोतनीस, डॉ.मनिषा कायंदे, **वि.प.स.** पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.

"मुंबईतील धोकादायक इमारतींमधील रहिवाशांना पर्यायी घरे उपलब्ध करुन देण्यासाठी संक्रमण शिबिराची संकल्पना येणे, धोकादायक इमारतीतील रहिवाशांना निवारा देण्याचा संक्रमण शिबिराचा मूळ हेतू असणे, परंतु म्हाडा मधील गैरव्यवहारामुळे संक्रमण शिबिराचा मूळ हेतू साध्य न होणे, सुमारे ४० ते ५० वर्षांपासून अनेक रहिवाशी पुनर्विकासातून हक्काचे घर मिळण्याच्या प्रतिक्षेत असणे, संक्रमण शिबिरांची बिकट स्थिती निर्माण झाल्यामुळे मूळ इमारतीतून एकदा संक्रमण शिबिरात रवानगी झाल्यावर वर्षानुवर्षे तिथेच रहावे

अप्रकाशित प्रत

लागत असणे, त्यामुळे या संक्रमण शिबिरात जाण्यास धोकादायक इमारतीतील रहिवासी तयार नसणे, मुंबई शहरातील भेंडीबाजार मधील हुसैनी इमारत कोसळून ३२ रहिवाशांचा मृत्यू झाल्याच्या घटनेची पुनरावृत्ती होण्याची शक्यता निर्माण झाली असणे, संक्रमण शिबिरातील मूळ रहिवाशांचे त्याच जागी पुनर्वसन करण्याची घोषणा शासनाने करुनही त्याची अंमलबजावणी झाली नसून याकडे शासनाचे दुर्लक्ष होत असणे, याबाबत मुंबईतील संक्रमण शिबिरातील मूळ रहिवाशांचे पुनर्वसन करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

**विधान भवन,**
मुंबई,
दिनांक : ११ मार्च, २०२२.

**राजेन्द्र भागवत**
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानपरिषद